ePaper
“मोदींना आताच हिमालयात पाठवा, देशाचं भलं होईल”: प्रकाश आंबेडकर



वर्ष - 7 । अंक - 156 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत


- विराटच्या बालेकिल्ल्यात धमाका!
- दिशाला सुरक्षारक्षकानं परत पाठवलं!
- काँग्रेसच्या बैठकीत कँडी क्रश!
- अनुसूचित जमाती आयोग स्थापन!


www.mahaenews.com | गुरुवार, दिनांक 12 ऑक्टोंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## आमदार अश्विनीताईंच्या खांद्यावर ‘बंदूक’;

# शहराध्यक्ष शंकर जगताप ‘टार्गेट’!

### »अल्पसंतुष्टांची वातावरण निर्मिती: बावनकुळेंचा प्रभावी ‘उतारा

।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या दौऱ्याच्या निमित्ताने अल्पसंतुष्ट लोकांकडून गेल्या दोन दिवसांपासून भाजपामध्ये नाराजी नाट्य रंगविण्यास सुरुवात केली होती. मात्र, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी कारण नसताना गोष्टींचा विपर्यास केला गेला, असे म्हणत सर्वांनाच पक्षामध्ये मान मिळतो, असे बाजवत अल्पसंतुष्ट लोकांना प्रभावी उतारा दिला.**



साधारण दोन दिवसांपूर्वी प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या दौऱ्याच्या निमित्ताने भाजपाचे शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी पत्रकार परिषद घेताना ‘महाविजय २०२४’ अंतर्गत ‘घर चलो’ अभियानाची माहिती दिली. यावेळी पत्रकारांच्या प्रश्नांना देखील शहराध्यक्ष यांनी योग्य उत्तरे दिली. यावेळी सर्वच भाजपाचे वरिष्ठ पदाधिकारी व चिंचवडच्या आमदार अश्विनी जगताप यांच्यात पक्षाच्या ‘प्रोटोकॉल’ या संदर्भात बोलणे सुरु होते. मात्र, याच गोष्टीचा धागा पकडताना अल्पसंतुष्ट लोकांनी शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या विरोधात वातावरण निर्मिती करण्यास सुरुवात केली.

यापूर्वी देखील शहराध्यक्ष शंकर जगताप यांची शहराध्यक्षपदी निवड झाल्यानंतर भाजपाच्या अतिमहत्वाकांक्षी विरोध करण्यास सुरुवात केली होती. मात्र, त्यावेळी त्यांची ‘डाळ न शिजल्याने’ त्यांना माघार घ्यावी लागली होती. त्यानंतरही शहराध्यक्ष जगताप यांनी वातावरण अजून गढूळ होवू न देता, सामोपचाराच्या भूमिकेतून सर्वांची मनधरणी करण्यात यश मिळविले होते.

काहीच दिवसांपूर्वी शहर भाजपाच्या वतीने जम्बो कार्यकारिणी देखील जाहीर करण्यात आली होती. यावेळी देखील काहीनी नाराजीचा सूर उमटवला होता. मात्र, शंकर जगताप यांनी शहराच्या सर्वच भागांना समसमान महत्व देताना, पुन्हा एकदा अल्पसंतुष्ट गटाला तोंडघाशी पडले होते.

आता पत्रकार परिषदेच्या वेळी झालेल्या संवादाला अल्पसंतुष्ट गटाने खतपाणी घालताना पुन्हा एकदा शहराध्यक्ष जगताप यांच्या विरोधात वातावरण निर्मितीचा प्रयत्न केला. मात्र, आजच्या दौऱ्यात प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी ‘गोष्टींचा विपर्यास करण्यात आला, भाजपामध्ये प्रत्येकालाच त्याचा मानसन्मान मिळतो, असे म्हणताना अल्पसंतुष्ट गटाची पुन्हा एकदा हवा काढली.

#### कार्यक्रमाच्या मंचावर सर्वजण एकत्र...

»अल्पसंतुष्ट गटाच्या लोकांनी भाजपामध्ये सर्व काही आलबेल नसल्याचे दाखविण्याचा पुरेपूर प्रयत्न केला. परंतू, आजच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने सर्वच पदाधिकारी पुन्हा एकदा एकाच मंचावर उपस्थित राहिले. त्यामुळे अल्पसंतुष्ट गटाच्या पुन्हा एकदा हिरमोड झाला. शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या नेतृत्वाखाली ‘महाविजय २०२४’ अंतर्गत ‘घर चलो’ या अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. या अभियानात भाजपाच्या चिंचवडच्या आमदार अश्विनी जगताप यांनी युवा वॉरियर्स यांना देखील मार्गदर्शन केले. त्यामुळे भाजपामध्ये पुन्हा कलह निर्माण करण्यात अल्पसंतुष्ट गटाच्या लोकांना हात चोळत बसावे लागले.

---

# लेकासाठी अजित पवारांकडून ३२ वर्षांच्या जबाबदारीचा त्याग

### »पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या संचालकपदी पार्थ पवार?

।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महाराष्ट्रात आघाडीची मनाली जाणाऱ्या पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालकपदाचा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राजीनामा दिला आहे. राज्यात पक्ष संघटनेसाठी द्यावा लागणारा वेळ, उपमुख्यमंत्रीपदाच्या कार्यबाहुल्यामुळे बँकेच्या कामकाजात लक्ष देता येत नाही तसेच बैठकांना उपस्थित राहता येत नसल्याचे कारण दिल्याने बँकेच्या संचालक मंडळाने त्यांचा राजीनामा मंजूर केला आहे.**



अजित पवार यांच्या नंतर त्यांच्या जागेवर बँकेचा संचालक कोण होणार? यावरून चर्चा सुरु असतानाच आता या जागेसाठी अजित पवार यांचे चिरंजीव पार्थ यांचं नाव या पदासाठी चर्चेत आले आहे. राजकारणात सक्रिय झाल्यानंतर अजित पवार यांनी सहकारच्या राजकारणात आपलं पाहिलं पाऊल टाकत १९९१ साली पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक पद स्विकारले होते. त्यानंतर सलग ३२ वर्ष अजित पवारांनी ही जबाबदारी पार पाडली. या कालावधीत अजित पवार अजित पवार यांनी चार वेळेस उपमुख्यमंत्री पद भूषविले. त्यानंतर आता पाचव्यांदा शिंदे-फडणवीस सरकारमध्ये उपमुख्यमंत्री पदाची जबाबदारी मिळाली आहे. मात्र यावेळेस अजित पवारांनी कामाचा लोड असल्याचे कारण देत थेट जिल्हा बँकेच्या संचालक पदाचा राजीनामा दिला आहे. अजित पवार यांनी राष्ट्रवादीचा एक मोठा गट घेऊन शिंदे - फडणवीस सरकारमध्ये सहभागी होण्याचा निर्णय घेतल्यानंतर अजित पवारांचे पुत्र पार्थ पवार हे जागोजागी अजित पवारांच्या सोबत दिसतं आले आहेत.

#### पार्थ पवार यांचे रिलॉंचिंग...

» कामाचा मोठा आवका असलेल्या अजित पवारांच्या या निर्णयाने सर्वांच्याच भुवया उंचवल्या आहेत. तर दुसरीकडे आपले पुत्र पार्थ पवार यांच्या रिलॉंचिंगसाठीच अजित पवारांनी राजीनामा देण्याचा निर्णय घेतल्याच्या चर्चा सुरु झाल्या आहेत. कारण आता अजित पवारांच्या जागेवर आता पार्थ पवार पुणे जिल्हा माध्यवर्ती बँकेचे संचालक होणार असल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली आहे. निवडणूक प्राधिकरणाने निवडणूक जाहीर केल्या नंतर ही निवडणूक लागणार आहे. बारामती तालुका अ वर्ग मतदारसंघातून पार्थ पवार संचालक होणार आहेत. यासाठी संचालक मंडळ मतदान करणार आहे.

# मित्रपक्षांसोबत एकजुटीने लोकसभा लढू... महाविजय मिळवू!

## » भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचा विश्वास




। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मावळ लोकसभा क्षेत्रात सुमारे ३५० हूनअधिक घरी जाण्याचा आमचा संकल्प आहे. एकूण ११ राजकीय पक्षांची महायुती आगामी लोकसभा निवडणुकीत राज्यातील ४५ जागा प्रचंड बहुमताने जिंकेल. सर्वच बूथवर आम्हाला ५१ टक्के मते मिळतील. निवडणुकीत ज्या पक्षांकडे जागा जातील, त्या प्रत्येक ठिकाणी भाजपा आणि मित्रपक्ष एकजुटीने लढून विजय मिळवू, असा विश्वास भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला.**

## » 'घर चलो अभियान'द्वारे शहरात जोरदार शक्तीप्रदर्शन

### केंद्र सरकारच्या उपलब्धीची उजळणी...

» घर चलो अभियानाच्या समारोपाच्या छोटेखाणी सभेमध्ये प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांनी केंद्रातील मोदी सरकारच्या वतीने मागील ९ वर्षांमध्ये घेण्यात आलेल्या विविध निर्णयांची आठवण करून दिली. यामध्ये तीन तालाख, राममंदीर, नारी शक्ती वंदन, नुकतीच सुरु झालेली विश्वकर्मा योजना आदी विषयांचा धावता आढावा यावेळी बावनकुळे यांनी घेताना उपस्थितांना त्यानी केलेल्या मतदानामुळे हे शक्य झाले असल्याचे सांगितले.

### बावनकुळे यांचे जोरदार स्वागत

» भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे हे आज शहरात शहर भाजपाच्या 'घर चलो' अभियानासाठी आले होते. त्यांचे ढोलताशांच्या गजरात स्वागत करण्यात आले. यावेळी शहरातील महिला कार्यकर्त्यांनी देखील भगवे फेटे बांधताना अभियानाचा उत्साह वाढविला. शहर भाजपाच्या वतीने प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांना सुमारे ३० फुटांचा हार देखील घालण्यात आला. आजच्या कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले.

पिंपरी- चिंचवड शहर भाजपाच्या वतीने 'महाविजय-२०२४' अंतर्गत 'घर चलो अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप, आमदार अश्विनी जगताप, आमदार महेश लांडगे, विधान परिषदेच्या आमदार उमा खापरे, यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने या अभियानात सहभागी झाले होते. प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांनी पिंपरी-चिंचवड येथे मावळ लोकसभा मतदारसंघातील पिंपरी, चिंचवड आणि मावळ विधानसभा मतदारसंघांतील 'भाजपा वॉरियर्स' शी संवाद साधला. 'घर चलो अभियान' अंतर्गत पिंपरी, राधिका चौक येथून अभियानाला सुरुवात करण्यात आली. त्यानंतर,



शगुन चौक व साई चौक परिसरातील नागरिकांची भेट घेतली. यावेळी नागरीकांनी प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांनी संवाद साधला. त्यावेळी नागरिकांनी देखील पंतप्रधान म्हणून पुन्हा एकदा नरेंद्र मोदी यांच्याच नावाला पसंती दर्शविली. 'नारीशक्ती वंदन' या विषयावर बोलताना बावनकुळे म्हणाले की, नरेंद्र मोदी यांनी महिलांसाठीचे आरक्षण विधेयक पास करून घेतले आहे. देशावर जेव्हा संकट आले, तेव्हा महिलांनी कणखरपणा दाखविला. आता देखील लोकसभेत १९१, तर विधानसभेत सुमारे १०० महिलांना

### राम मंदीर उभारले आता कसं वाटतंय ?

» पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने राममंदीर संदर्भातील सर्व अडथळे दूर केले व गतवर्षीपासून भव्य राम मंदिराच्या निर्माणाला सुरुवात झाल्याचे सांगितले. सन २०२४ च्या जानेवारी महिन्यात हे मंदीर सर्वांसाठी खुले होणार आहे. यावर भाष्य करताना बावनकुळे म्हणाले, ज्यावेळी आम्ही राममंदिरासाठी भांडत होतो, त्यावेळी कॉंग्रेस नेत्यांनी लाल कृष्ण आडवाणी यांना 'मंदिर वही बनाएंगे, मगर तारीख नाही बताएँगे'असे म्हणताना टिंगल केली होती.

### नागरिकांची पुन्हा मोदींनाच पसंती...

» *प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी मावळ लोकसभा प्रवास या दरम्यान घाटाच्या खाली व घाटाच्या वर अशा दोन्ही ठिकाणी नागरिकांशी संवाद साधला. आज पिंपरी येथील शगुन चौक, साई चौक, राधिका चौक या व्यापारी भागातील नागरिकांना भेटले. मोठी बाजारपेठ असणाऱ्या या भागातील नागरिकांनी देखील प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांचे जोरदार स्वागत केले. यावेळी बावनकुळे यांनी आगामी प्रधानमंत्री म्हणून तुम्ही कुणाकडे पहाता असा प्रश्न केला असता, सर्वच नागरिकांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हेच पुन्हा प्रधानमंत्री होतील असे आत्मविश्वासाने आणि जोशात सांगितले.*

# चऱ्होलीत होणार ‘परंपरा-संस्कृती जतन’!

## वाघेश्वर मंदिर परिसराचे अत्याधुनिक सुविधांनी सुशोभिकरण

### भाजपा आमदार महेश लांडगे यांचा यशस्वी पाठपुरावा

।पिंपरी ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहरातील ऐतिहासिक महत्त्व असलेले चऱ्होली बुद्रुक येथील श्री वाघेश्वर मंदिर आणि परिसराचे अत्याधुनिक सोयी-सुविधांनी सुशोभिकरण करण्यात येणार आहे. महाशिवरात्रीच्या निमित्ताने या ठिकाणी मोठी यात्रा वर्षानुवर्षे भरते. येथील बैलगाडा घाटही प्रसिद्ध आहे. त्यामुळे ‘परंपरा आणि संस्कृतीचे जतन’ करण्यासाठी भाजपा आमदार महेश लांडगे यांनी पुढाकार घेतला आहे.**



भाजपा आमदार महेश लांडगे आणि माजी महापौर नितीन काळजे यांनी याबाबत पुढाकार घेतला असून, महापालिका प्रशासनाच्या माध्यमातून लवकरच कामाला सुरूवात करण्यात येणार आहे.

महापालिका प्रभाग क्रमांक ३ चऱ्होली येथील श्री वाघेश्वर मंदिराच्या सभोवताचा परिसर सुशोभिकरण करणे. या कामामध्ये येथील परंपरागत बैलगाडा शर्यत घाट, कुस्ती आखाडा याचेही नूतनीकरण करण्यात येणार आहे. या भागात आलेले भाविक किंवा नागरिकांसाठी मंदिर परिसरातील टेकडीचे सुशोभिकरण करण्यात येणार आहे. त्यासाठी सुमारे ११ कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहे. आगामी महाशिवरात्रीच्या यात्रेपूर्वी सुशोभिकरण आणि घाटाचे काम पूर्ण व्हावे, असे नियोजन करण्यात आले आहे.

### सुशोभिकरणासाठी ‘उत्सव थीम’...

**» श्री. वाघेश्वर मंदिर आणि टेकडी परिसराचे सुशोभिकरण करण्यासाठी ‘उत्सव थीम’चा निश्चित करण्यात आली आहे. हा उत्सव... संस्कृतीचा आणि पारंपरिक क्रीडा प्रकारांचा असेल. त्याद्वारे कुस्ती आखाडा, बैलगाडा घाट, टेकडीच्या उतारावर जलसंधारण, भव्य प्रवेशद्वार, भक्ती आणि शक्तीचे प्रतिक असलेली प्रभू श्रीराम भक्त हनुमान यांच्या गदेची प्रतिकृती, कुस्तीपटूंचे शिल्प, बैलगाडा शिल्प असे आकर्षन असणार आहे.**

“ चऱ्होलीतील श्री वाघेश्वर महाराज मंदिर हा आपल्या अस्मितेचा आणि श्रद्धेचे स्थान आहे. पुणे जिल्ह्यातून या ठिकाणी भाविक येत असतात. समाविष्ट गावांच्या विकासाचा ‘बॅकलॉग’ भरुन काढण्यासाठी आम्ही पुढाकार घेतला. ‘मोशी-चिखली-चऱ्होली रेसिडेन्सिअल कॉरिडॉर’ विकसित होत आहे. नागरिकांना मोकळा श्वास घेता यावा, अशी ठिकाणे विकसित करणे काळाची गरज आहे. त्यामुळे भौगोलिक वैभवसंपन्न चऱ्होली आणि वाघेश्वर मंदिर परिसरात ‘आपली परंपरा आणि संस्कृती’चे जतन होणार असून, या परिसराचे भव्य सुशोभिकरण करण्यासाठी आम्ही सर्वोतोपरी प्रयत्न करणार आहोत.

**- महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा. पिंपरी-चिंचवड.

---

# मनपा सुविधांची माहिती एका ‘क्लिक’वर!

## आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह : “सिटिझन जिओपोर्टल”चे लोकार्पण

।पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**नागरिकांसाठी ऑनलाइन सेवा सुलभ करणे आणि महानगरपालिकेच्या विभागांच्या अंतर्गत प्रशासन कार्यक्षमतेत सुधारणा करण्याच्या उददेशाने पिंपरी चिंचवड मनपा व स्मार्ट सिटी लि. यांच्या संयुक्त विद्यमानाने जीआयएस सक्षम इआरपी प्रणाली हाती घेण्यात आली आहे. या उपक्रमांतर्गत नागरिकांना एका क्लिकवर इत्यंभूत सेवांची माहिती देण्यासाठी “सिटिझन जिओपोर्टल” सूरू करण्यात आले असून, या पोर्टलचे आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी शेखर सिंह यांच्या हस्ते आज, दि. ११ रोजी उदघाटन करण्यात आले..**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ४१ व्या वर्धापन दिनानिमित्त प्रा. रामकृष्ण मोरे, प्रेक्षागृह चिंचवड येथे हा कार्यक्रम पार पडला. यावेळी अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे, विजय खोराटे, उल्हास जगताप, शहर अभियंता मकरंद निकम, स्मार्ट सिटीचे सह मुख्य कार्यकारी अधिकारी किरणराज यादव, मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी निळकंठ पोमण, उपायुक्त रविकिरण घोडके, मुख्य आरोग्य व वैद्यकीय अधिकारी लक्ष्मण गोफणे, अधिष्ठाता राजेंद्र वाबळे, सहशहर अभियंता श्रीकांत सवणे, प्रमोद ओंबासे, सहाय्यक आयुक्त श्री. दंडवते, माहिती व तंत्रज्ञान अधिकारी अनिता कोटलवार, विजय बोरुडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनसंपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह एटॉस इंडियाचे प्रकल्प संचालक अविनाश पाटील, नॅसेंट प्रकल्प व्यवस्थापक डॉ. प्रशांत परसाई, केपीएमजी प्रकल्प व्यवस्थापक कल्पेश बोंडे, सिताराम फुले आदी उपस्थित होते. प्रसंगी, व्हिडिओ चित्रफीतीद्वारे सदर प्रकल्पाचे सादरीकरण करण्यात आले.



या प्रकल्पाबाबत आयुक्त शेखर सिंह म्हणाले की, भारत सरकारच्या स्मार्ट सिटी मिशन अंतर्गत पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लिमिटेड मार्फत जीआयएस सक्षम ईआरपी प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. या प्रकल्पामध्ये ६ सॅप मॉड्यूल्स, २५ नॉन-कोर आयटी ॲप्लिकेशन्स, डॉक्युमेंट मॅनेजमेंट सिस्टम आणि भौगोलिक माहिती प्रणाली (GIS) चा समावेश आहे. जिओपोर्टल सुविधा HTTPS://SMARTGISDA.PCMCINDIA.GOV.IN/CITIZENPORTAL/ या लिंकवर तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका वेबसाइटवर ( PCMCINDIA.GOV.IN ) “आपले शहर जाणून घ्या” आयकॉन अंतर्गत उपलब्ध आहे, यातून शहरातील लहान रस्त्यांची व ठिकाणांची माहिती नागरिकांना होणार आहे. सदर पोर्टल एटॉस इंडिया आणि नॅसेंट इन्फॉरमेशन टेक्नॉलॉजीज यांनी विकसित केला आहे, असे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी सांगितले.

### सिटिझन जिओ पोर्टलद्वारे मिळणार या सुविधा...

**» दोन ठिकाणांमधील अंतर, जागांचे क्षेत्रफळ मोजता येणार आहे.**
**» पोर्टलवर पीसीएमसी सुविधा बुकिंग पर्याय देखील उपलब्ध करून देण्यात येणार आहे. ज्यावरून नागरिक क्रीडा मैदान, बॅडमिंटन हॉल इत्यादी सुविधा बुक करू शकतात.**
**» कोणत्याही स्थानाचा शोध घेवून लहान मार्गाची गणना करण्यासाठी नेव्हिगेशन सिस्टम तयार करण्यात आली आहे.**
**» नागरिक निवडलेल्या नकाशाची प्रिंट घेऊ शकतात.**
**» नागरिकांना जिओपोर्टलची कार्यप्रणाली समजण्यासाठी वापरकर्ता पुस्तिका देखील पोर्टलवर देण्यात आली आहे.**
**» नागरिक मराठी आणि इंग्रजी भाषांमध्ये जिओपोर्टलवर माहिती पाहू शकतात.**




# न्यूजक्लिक'वरील धाडींच्या निमित्ताने

**अमेरिकेत १९४० च्या दशकाच्या अखेरचा आणि १९५० च्या दशकाच्या सुरुवातीचा काळ 'मॅकार्थी काळ' म्हणून ओळखला जातो. जोसेफ मॅकार्थी हे एक अमेरिकन सेनेटर होते. कम्युनिस्ट व्यक्तींना लक्ष्य करणाऱ्या मोहिमेचं नेतृत्व त्यांनी केलं होतं.**

अमेरिकन संस्थांवर कम्युनिस्ट आणि सोव्हिएत रशियाचा प्रभाव वाढत चालल्याचं कारण पुढे करून डाव्या विचारसरणीच्या माणसांची राजकीय गळचेपी समर्थनीय ठरवली जात होती. या प्रचाराच्या केंद्रस्थानी होता भीतीचा बागुलबुवा. त्यातूनच शेकडो लोकांना तुरुंगात डांबण्यात आलं आणि हजारोंच्या नोकऱ्या गेल्या. या लोकांविरोधात केलेले बहुतेक आरोप मूर्खपणाचे होते हे नंतर सिद्ध झालं. गेली काही वर्ष भारतातही साधारण अशीच परिस्थिती निर्माण झालेली आहे. ३ ऑक्टोबरला मॅकार्थी काळाची आठवण देणारी आणखी एक घटना घडली. दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेलने 'न्यूजक्लिक' या प्रस्थापित व्यवस्थेच्या विरोधात असणाऱ्या संकेतस्थळाशी संबंधित ५० हून अधिक पत्रकारांवर छापे घातले. चीनकडून 'न्यूजक्लिक'ला पैसे मिळत असल्याचा आरोप करत पोलिसांनी ही कारवाई केली होती. या पत्रकारांचे फोन, लॅपटॉप आणि इतर उपकरणं जप्त केल्यानंतर दिल्ली पोलिसांनी काही पत्रकारांना



ताब्यात घेतलं आणि अनेक तास त्यांची चौकशी केली, त्यांच्यावर प्रश्नांची सरबत्ती केली. त्याचा शेवट 'न्यूजक्लिक'चे संस्थापक प्रबीर पूरकायस्थ आणि मानवी संसाधन विभागाचे प्रमुख अमित चक्रवर्ती यांच्या अटकेने झाला. या अटकेने प्रबीरच्या बाबतीत एक गोष्ट घडली. इंदिरा गांधींनी घोषित केलेल्या आणीबाणीमध्येही ते तुरुंगात गेले होते आणि आता नरेंद्र मोदींच्या अघोषित आणीबाणीमध्येही त्यांना तुरुंगवास भोगावा लागत आहे! 'न्यूजक्लिक' सुरू करताना प्रबीरच्या समोर एक साधं ध्येय होतं. भारतीय प्रसारमाध्यमांमधून विविध चळवळींना मिळणारं स्थान कमी कमी होत चालल्याचं त्यांच्या लक्षात आलं होतं. शहरातल्या ट्रॅफिकवर विपरीत परिणाम झाला तरच शेतकऱ्यांच्या मोर्चाचे मथळे झळकतात, अन्यथा त्याकडे माध्यमं फारसं लक्ष देत नाहीत, असं त्यांना वाटत होतं. कामगार आणि शेतकरी संघटनांचा संघर्ष, अन्यायग्रस्त लोकांचा लढा या सगळ्याला आपण स्थान द्यायला हवं, असा विचार त्यांनी केला. त्यातूनच 'न्यूजक्लिक'चा जन्म झाला आणि प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन रिपोर्टिंग करणाऱ्या तरुण पत्रकारांना त्यांनी नोकरी दिली. प्रबीर किंवा परनजॉय गुहा ठाकुरता आणि अभिसार शर्मा हे ज्येष्ठ पत्रकार सरकारच्या या दडपशाहीचा चेहरा ठरले आहेत हे तर खरंच, पण दिल्ली पोलिसांनी या संस्थेशी संबंधित अनेक तरुण पत्रकारांनाही त्रास दिला, हेसुद्धा विसरता कामा नये. यातले काही पत्रकार तर 'न्यूजक्लिक'मध्ये आता कामही करत नाहीत. गेल्या आठवड्यात मी दिल्लीमध्ये होतो तेव्हा यातल्या काही तरुण पत्रकारांना भेटलो. त्यांच्या चेहऱ्यावर हसू होतं, पण म्हणून त्यांच्या मनातली खळबळ लपून राहात नव्हती. दिल्ली पोलीस त्यांच्या घरात घुसले, त्यांची उपकरणं जप्त केली, त्यांच्याशी अरेरावीने वागले. कोणाही तरुण पत्रकारासाठी आणि त्याच्या किंवा तिच्या कुटुंबीयांसाठी हा अनुभव अस्वस्थ करणारा असणार यात शंकाच नाही. यातले बहुतेक मध्यमवर्गीय कुटुंबांतून आलेले आहेत आणि आपल्या पालकांच्या इच्छेच्या विरोधात जाऊन पत्रकारिता करताहेत. मी एका वार्ताहराला भेटलो. विशीतला हा तरुण निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजस्थानला जाण्याची योजना आखत होता. मानवी हक्कांशी संबंधित अनेक बातम्या, लेख यांची आखणी त्याने केलेली होती आणि 'न्यूजक्लिक'ने आपल्यासाठी ही मालिका करण्याची त्याला संमतीही दिली होती. पण हे छापे आणि संस्थापकाची अटक यामुळे हा दौरा आता होऊ शकेल की नाही याविषयी त्याच्या मनात स्वाभाविकच शंका आहे. तरुण पत्रकारांना असा त्रास देऊन मोदी सरकार इतर स्वतंत्र प्रसारमाध्यमं आणि आदर्शवादी तरुण पत्रकारांना एक संदेश देत आहे. अन्यथा, एखाद्या संकेतस्थळाच्या व्यावसायिक मॉडेलची चौकशी करताना, त्या संस्थेला मिळणाऱ्या महसुलाशी ज्यांचा काहीही संबंध नसतो अशा पत्रकारांना कोणी का लक्ष्य करेल? 'न्यूजक्लिक'वर कोणते आरोप आहेत?

## संपादकीय »

# प्रक्रियावादी

***वास्तविक खुद्द सिक्कीम राज्य सरकारच्या पाहणीने २०१२ साली केलेल्या अभ्यासांत हा धोका दाखवून दिला होता.***

सत्ताधीश दोन प्रकारचे असतात. त्यांचे वर्णन प्रकल्प-प्रेमी आणि दुसरे प्रक्रिया-स्नेही असे करता येईल. पहिल्या प्रकारातील मंडळीस भव्य पुतळे, महामार्ग, पूल इत्यादींच्या उभारणीत रस असतो तर दुसऱ्या वर्गातील सत्ताधीश असे नेत्रसुखद काही करण्यापेक्षा सामान्यांच्या आयुष्यात काही निश्चित बदल होईल अशा प्रकारचे सकारात्मक बदल प्रक्रियेद्वारे करीत असतात. यात प्रसिद्धी नसते. दूरसंचार सुधारणा, आर्थिक उदारीकरण, परमिट राज खालसा, रोजगार हमी योजना ही काही यांतील दुसऱ्या प्रकारची उदाहरणे. हा ऊहापोह आता करण्याचे कारण म्हणजे गतसप्ताहात सिक्कीमसारख्या मोहक आणि नाजूक राज्यात निसर्गाने घडविलेला उत्पात. गतसप्ताहाच्या अखेरीस पश्चिम आशियाई वाळवंटातील मानव-निर्मित हाहाकाराने सिक्कीममधील घटनांवर भाष्य मागे पडले. वर्तमानपत्रीय निकषांनुसार त्यास विलंब झाला.

**'टोल नाक्यांवर मनसेचे कार्यकर्ते उभे राहतील आणि चारचाकी आणि छोट्या वाहनांकडून टोल वसूल करून देणार नाहीत. विरोध झाल्यास टोल नाके जाळून टाकू' या शब्दांत मनसेचे प्रमुख राज ठाकरे यांनी इशारा दिल्यामुळे मनसे आणि टोल हे विषय पुन्हा चर्चेत आले आहेत. जाळपोळ किंवा हिंसाचार कधीच समर्थनीय ठरू शकत नाही.**

# ठाकरे-फडणवीसांखेरीज सारेच गप्प?

मात्र वाहनचालक, नागरिक आपल्याच बाजूने असणार याची खात्री हा इशारा देणाऱ्या संघटनेला वाटू शकते, याचे कारण काय? रस्तेबांधणीच्या खासगीकरणामुळे वाहनचालकांवर २००० सालापासून टोलचा बोजा आला. रस्ते व अन्य पायाभूत सुविधा चांगल्या मिळत असल्यास टोल भरण्यास कोणाचा विरोध असण्याचे कारण नव्हते. टोलची दरवाढ कोणत्या वर्षी- कोणत्या महिन्यात होणार हे ठरलेले असते, टोल नाक्यांवर किती वसुली झाली याची माहिती देणारा फलक झळकत असतो, पण प्रत्यक्षात टोलवसुली किती होते हे फक्त ठेकेदारालाच ठाऊक असते. टोलवसुलीत प्रचंड फायदा असल्याने राजकीय नेतेही या व्यवसायात भागीदारी करू लागले. ठेकेदार, राजकारणी आणि अधिकारी यांची अभद्र युती तयार झाली. यामुळेच महाराष्ट्रात टोलवसुलीच्या नावाखाली लुबाडणूक सुरू आहे, टोलमाफिया



बोकाळले आहेत, या भावनेला सहज भडकावता येते. भूसंपादनास विरोध करणाऱ्या एका नागरिकाच्या हत्येप्रकरणी टोल ठेकेदारच आरोपी होता, यांसारख्या घटनांतून हीच भावना दृढ होते.

टोल ठेकेदारांकडून दरमहा स्थानिक नेतेमंडळींना ठरावीक रक्कम दिली जात असल्याची चर्चा असते. राज ठाकरे यांनीही तसाच आरोप केला आहे. कोणत्याही राजकीय पक्षांचे नेते टोल विरोधात उघड भूमिका घेत नाहीत वा टोल बंद झाले पाहिजेत म्हणून आंदोलन करीत नाहीत. मुंबईतील टोलवसुलीच्या विरोधात मनसेच्या कार्यकर्त्यांनी उपोषण व आंदोलन केले. पण आमदार असताना काही वर्षांपूर्वी एकनाथ शिंदे यांनी याच टोलवसुलीच्या विरोधात न्यायालयात याचिका दाखल केली होती. आता ते मुख्यमंत्री आहेत. त्यांनी इच्छाशक्ती दाखविल्यास ठाणेकरांची टोलच्या जाचातून सुटका होऊ शकते. पण त्यासाठी मुख्यमंत्र्यांना धमक दाखवावी लागेल. देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रीपदी असताना ५० पेक्षा अधिक टोल नाक्यांवर छोट्या वाहनांना टोल माफ करण्यात आला होता, तसा निर्णय शिंदे सहज करू शकतात. टोलच्या विरोधातील मनसेचे हे पहिले आंदोलन नाही. पृथ्वीराज चव्हाण मुख्यमंत्रीपदी असतानाही राज ठाकरे यांनी टोलच्या विरोधात आंदोलन केले होते. पण टोल काही बंद झाला नाही वा टोलच्या धोरणांमध्ये बदल झाला नाही. टोल लागू केला जातो तेव्हाच प्रत्येक तीन वर्षांनंतर टोलचे दर किती असतील याचे कोष्टक जाहीर केले जाते. यानुसार १ ऑक्टोबरपासून मुंबईच्या वेशीवर टोलच्या दरात वाढ झाली. मग मनसेने आंदोलन केले.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# स्वतंत्र अनुसूचित जमाती आयोग स्थापन!

## डिसेंबर अखेरपर्यंत निधी वितरीत करणार : मुख्यमंत्री शिंदे

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**अनुसूचित जमातीसाठी राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. केंद्र शासनाच्या धर्तीवर महाराष्ट्रासाठी स्वतंत्र अनुसूचित जमाती आयोग स्थापन करण्यास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मान्यता दिली आहे.**

मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या राज्य जनजाती सल्लागार परिषदेमध्ये या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली. यासोबतच राज्याच्या अनुसूचित क्षेत्राच्या पुनर्रचनेबाबत, लोकसंख्येच्या प्रमाणात निधीची तरतूद, आदिवासी जिल्ह्यातील तालुक्यांमध्ये प्रकल्प कार्यालय सुरू करणे आदी विविध विषयांवर या बैठकीत चर्चा करण्यात आली. मंत्रालयातील मंत्रिमंडळ सभागृहात झालेल्या या बैठकीस उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ, आदिवासी विकास मंत्री डॉ. विजयकुमार गावित, अन्न व औषध प्रशासन मंत्री धर्मरावबाबा आत्राम यांच्यासह आदिवासी क्षेत्रातील खासदार, आमदार उपस्थित होते. राज्यासाठी स्वतंत्र अनुसूचित जमाती आयोग स्थापन करण्याबाबत विधी व न्याय विभागाचे अभिप्राय घेण्यात आले असून या आयोगाच्या अधिनियमाचा मसूदा आदिवासी



संशोधन व प्रशिक्षण संस्थेकडून तयार करून घेण्यात आला आहे. आज झालेल्या राज्य जनजाती सल्लागार परिषदेच्या ५१ व्या बैठकीत त्यास पुढील कार्यवाहीसाठी मान्यता देण्यात आली. आदिवासी विभागासाठी तरतूद करण्यात आलेला निधी त्या आर्थिक वर्षात खर्च झाला नाही तर तो व्यपगत होतो याविषयावर बैठकीत सविस्तर चर्चा झाली. विभागासाठी डिसेंबर अखेरपर्यंत संपूर्ण निधी वितरीत करायचा. अन्यत्र निधी वळवायचा नाही असे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले. आदिवासी क्षेत्रात होणाऱ्या कामांची गुणवत्ता दर्जेदार असली पाहिजे, रस्ते, आश्रमशाळा, वसतीगृह यांची कामे दर्जेदार होण्यासाठी यंत्रणेने प्रयत्न करावेत त्यासाठी त्याभागातील खासदार, आमदार यांनी संनियंत्रण करावे, असे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले. राज्यातील ११ अतिसंवेदनशील प्रकल्प कार्यालयांमध्ये प्रकल्प अधिकारी पदावर भारतीय प्रशासना सेवेतील अधिकाऱ्यांची पूर्णवेळ नियुक्ती करण्याबाबत यावेळी चर्चा झाली. प्रकल्प अधिकाऱ्यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील आश्रमशाळांना नियमित भेटी द्याव्यात, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले. यावेळी आदिवासी बहुल जिल्ह्यांमध्ये तालुकास्तरावर प्रकल्प कार्यालयांची निर्मिती करण्यासाठी मान्यता देण्यात आली. राज्यातील आदिवासी तालुक्यांना आकांक्षित तालुके घोषित करण्याबाबत यावेळी निर्णय घेण्यात आला.

### कामांची गुणवत्ता दर्जेदार असली पाहिजे

» आदिवासी विभागासाठी तरतूद करण्यात आलेला निधी त्या आर्थिक वर्षात खर्च झाला नाही तर तो व्यपगत होतो याविषयावर बैठकीत सविस्तर चर्चा झाली. विभागासाठी डिसेंबर अखेरपर्यंत संपूर्ण निधी वितरीत करायचा. अन्यत्र निधी वळवायचा नाही असे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले. आदिवासी क्षेत्रात होणाऱ्या कामांची गुणवत्ता दर्जेदार असली पाहिजे, रस्ते, आश्रमशाळा, वसतीगृह यांची कामे दर्जेदार होण्यासाठी यंत्रणेने प्रयत्न करावेत त्यासाठी त्याभागातील खासदार, आमदार यांनी संनियंत्रण करावे, असे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

# मोदींना आताच हिमालयात पाठवा!

## ॲड. आंबेडकरांची आरएसएसवर खोचक टीका

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**२०२४ च्या लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सत्ताधारी भाजपासह विरोधी पक्षांनी निवडणुकीच्या तयारीला सुरुवात केली आहे. विरोधी पक्षांच्या इंडिया आघाडीकडून जोरदार मोर्चेबांधणी केली जात आहे. पण देशात सलग तिसऱ्यांदा भाजपाची सत्ता येईल आणि नरेंद्र मोदी हेच पंतप्रधान बनतील, असा दावा भाजपा नेत्यांकडून केला जात आहे. तिसऱ्यांदा पंतप्रधान झाल्यानंतर नरेंद्र मोदी केवळ दोन वर्षे पंतप्रधान म्हणून काम करतील, त्यानंतर ते हिमालयात निघून जातील, असंही बोललं जात आहे.**

यावरून वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी पंतप्रधान मोदींसह राष्ट्रीय स्वंयसेवक संघ अर्थात आरएसएसवर जोरदार टोलेबाजी केली आहे. नरेंद्र मोदींना दोन वर्षांनी हिमालयात कशाला पाठवताय, त्यांना आताच हिमालयात पाठवा. देशाचं खूप भलं होईल, अशी टीका प्रकाश आंबेडकर यांनी केली. ते बीड येथील सभेत बोलत होते. यावेळी प्रकाश आंबेडकर म्हणाले, “नरेंद्र मोदींची तिसऱ्यांदा सत्ता येणार आणि ते फक्त दोन वर्षे पंतप्रधान राहणार, त्यानंतर ते साधू बनून हिमालयात निघून जातील, असा प्रचार सुरू आहे. माझं आरएसएसवाल्यांना आवाहन आहे, तुम्ही दोन वर्षांनी कशाला पाठवताय, तुम्ही आताच मोदींना हिमालयात पाठवून द्या. या देशाचं फार मोठं भलं होईल.” आगामी काळात नरेंद्र मोदी विरोधी पक्षांना ‘बापात बाप आणि लेकात लेक’ ठेवणार नाहीत, अशी अवस्था करतील,असंही प्रकाश आंबेडकर म्हणाले.

काँग्रेसशी युती करण्याबाबत प्रकाश आंबेडकर पुढे म्हणाले की, काँग्रेसला प्रेम (युती या अर्थाने) करण्यासाठी मोदींची परवानगी लागते. त्यांनी परवानगी दिली तरच ते आपल्याशी प्रेम करतील. मोदींनी परवानगी दिली नाही तर ते त्यांच्या मार्गाने आपण आपल्या मार्गाने. उद्या कदाचित आपल्याला आपला मार्ग निवडावा लागणार. कोणतंही युद्ध जिंकायचं असेल तर ते आधी डोक्यात जिंकायचं असतं. उद्याची लढाई आपल्याला जिंकायची असेल, त्यासाठी आरखडा तयार करावा लागेल.



### देशाचं फार मोठं भलं होईल

» “नरेंद्र मोदींची तिसऱ्यांदा सत्ता येणार आणि ते फक्त दोन वर्षे पंतप्रधान राहणार, त्यानंतर ते साधू बनून हिमालयात निघून जातील, असा प्रचार सुरू आहे. माझं आरएसएसवाल्यांना आवाहन आहे, तुम्ही दोन वर्षांनी कशाला पाठवताय, तुम्ही आताच मोदींना हिमालयात पाठवून द्या. या देशाचं फार मोठं भलं होईल.” आगामी काळात नरेंद्र मोदी विरोधी पक्षांना ‘बापात बाप आणि लेकात लेक’ ठेवणार नाहीत, अशी अवस्था करतील, असंही प्रकाश आंबेडकर म्हणाले.

# शिंदेंच्या बालेकिल्ल्यात भाजपसोबतचा वाद?

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

'कोकण पदवीधर निवडणूक आपण लढवली पाहिजे, पदवीधर मतदारसंघाच्या भाजप आमदारांनी आमच्या कामात आडकाठी केली आहे, आपल्याला सापत्न वागणूक दिली आहे', असा सूर शिवसेनेच्या ठाण्यात झालेल्या बैठकीत पदाधिकाऱ्यांनी मंगळवारी आळवला. त्यामुळे तब्बल २५ वर्षांहून अधिक काळ या मतदारसंघावर एकहाती पकड असलेल्या भाजपसमोर सेनेचेच आव्हान उभे राहण्याची चिन्हे दिसत आहेत. ठाण्यातच कोकण पदवीधर निवडणुकीच्या जागेवरून जुंपण्याची शक्यता आहे.. पदवीधर उमेदवारांची नोंदणी करण्याची मुदत डिसेंबरमध्ये संपणार आहे. या निवडणुकीत मतदार असलेल्या पदवीधरांची जास्तीत जास्त नोंदणी करण्याच्या दृष्टीने ठाण्यातील टेंभीनाका येथील आनंदाश्रमात पूर्वतयारीसाठी शिवसेनेची बैठक आयोजित करण्यात आली होती. 'कोकण पदवीधर मतदारसंघाचे सध्याचे भाजप आमदार ॲड. निरंजन डावखरे यांनी त्यांच्या कार्यकाळात शिवसेनेच्या लोकप्रतिनिधी व पदाधिकाऱ्यांना चुकीची वागणूक दिली आहे. ते ठाणे भाजप जिल्हाध्यक्ष असताना सेना-भाजपमध्ये खटके उडाले होते. त्यामुळे आता ही निवडणूक शिवसेनेने लढवली पाहिजे', अशी मागणी शिंदे गटातील काही माजी लोकप्रतिनिधींनी केली. दरम्यान, 'कार्यकर्त्यांची ही भावना मुख्यमंत्री शिंदे यांच्यापर्यंत पोहोचवली जाईल, अंतिम निर्णय तेच घेतील', असे बैठकीतील वरिष्ठ नेत्यांनी कार्यकर्त्यांना सांगितले. 'डाव' खरे ठरतील का? निरंजन डावखरे यांचे वडील राष्ट्रवादीचे नेते आणि विधान परिषदेचे माजी सभापती स्व. वसंत डावखरे यांचे सर्व पक्षांसोबत सलोख्याचे संबंध होते. 'अजातशत्रू' अशी ओळख त्यांना राजकीय जीवनात नेहमीच कामी आली. त्यामुळे त्यांच्याप्रमाणेच निरंजन हे येत्या कोकण पदवीधर निवडणुकीत उमेदवारी कायम ठेवण्यात यशस्वी होऊन आपले 'डाव' खरे ठरवतात का, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

# भारतीयांच्या सुटकेसाठी 'ऑपरेशन अजय'!

## » इस्त्रायलमध्ये लेबनॉन बॉर्डवरून घुसखोरी

।नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**इस्त्रायल-हमास युद्धाचा आज पाचवा दिवस आहे. अल्जझीराच्या वृत्तानुसार, लेबनॉन सीमेवरून घुसखोरी झाली आहे. येथे 15 फायटर पॅराग्लायडर्सवर दिसले आहेत. टाईम्स ऑफ इस्रायलच्या वृत्तानुसार, इस्रायल-लेबनॉन सीमेवरील 3 शहरांमध्ये अलर्ट जारी करण्यात आला आहे. याआधी 10 ऑक्टोबरला लेबनॉनमधून पुन्हा 15 रॉकेट डागण्यात आले होते. हे रॉकेट इस्रायलच्या पश्चिमेकडील गॅलील शहर आणि दक्षिणेकडील किनारी शहर अश्केलॉनमध्ये पडले.**

प्रत्युत्तरादाखल इस्त्रायली सैन्याने लेबनीज दहशतवादी संघटना हिजबुल्लाहच्या 3 ठाण्यांवर हल्ला केला आहे. यापूर्वी 8 ऑक्टोबर रोजी हिजबुल्लाहने लेबनॉन सीमेवरून इस्रायलवर गोळीबार आणि बॉम्बफेक केली होती. 8 ऑक्टोबर रोजी पहिल्यांदा लेबनॉनमधून इस्रायलवर मोर्टार डागण्यात आले. दरम्यान, इस्रायलमध्ये अडकलेल्या भारतीयांना बाहेर काढण्यासाठी सरकारने ऑपरेशन अजय सुरू केले आहे.

या अंतर्गत उद्या पहिली विमानसेवा निघणार आहे. परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांनी ही माहिती दिली आहे. अल जझिराने दिलेल्या माहितीनुसार, इस्रायलच्या हल्ल्यानंतर संपूर्ण गाझामध्ये वीजपुरवठा ठप्प झाला आहे. पॅलेस्टाईन एनर्जी अथॉरिटीचे अध्यक्ष थाफर मेलहेम



यांनी व्हॉईस ऑफ पॅलेस्टाईन रेडिओला सांगितले की गाझा पट्टीच्या एकमेव पॉवर प्लांटमध्ये इंधन संपले आहे. त्यामुळे संपूर्ण परिसराचा वीजपुरवठा ठप्प झाला आहे. रुग्णालयांचे इमर्जन्सी दिवे फक्त 2 दिवस चालतील. 9 ऑक्टोबर रोजी गाझा सीमा ताब्यात घेतल्यानंतर इस्रायलने गाझाला होणारा वीजपुरवठा बंद केला होता. दरम्यान, इस्रायलमध्ये हमासच्या विरोधात युद्ध मंत्रिमंडळ किंवा एकता सरकार स्थापन करण्यात आले आहे. 1973 नंतर प्रथमच असे घडले आहे. एकता सरकार म्हणजे सर्व पक्षांचा समावेश असलेले सरकार.

हे युद्धादरम्यान तयार केले जाते. टाईम्स ऑफ इस्रायलच्या वृत्तानुसार वॉर कॅबिनेटमध्ये 3 सदस्य आहेत. याआधी पॅलेस्टाईनने इस्रायलवर फॉस्फरस बॉम्ब फेकल्याचा आरोप केला आहे. पॅलेस्टाईनची वृत्तसंस्था 'वफा'ने दिलेल्या माहितीनुसार, इस्रायलच्या लष्कराने गाझाला लागून असलेल्या अल-करामा शहरावर इस्रायलने प्रतिबंधित फॉस्फरस बॉम्बचा वापर केला. ज्या भागात हे बॉम्ब पडतात तिथे ऑक्सिजनची पातळी कमी होते. त्याचे कण इतके लहान असतात की ते शरीरात प्रवेश करतात. त्याचवेळी इस्रायलच्या हवाई दलाने हमास कमांडर मोहम्मद डेफच्या वडिलांच्या घरावर हल्ला केल्याचे म्हटले आहे. टाईम्स ऑफ इस्रायलच्या रिपोर्टनुसार, या हल्ल्यात डेफच्या भावाचा मृत्यू झाला.

### गाझामध्ये यूएनचे 9 कर्मचारी ठार

» इस्त्रायल आणि हमास यांच्यातील युद्धात आतापर्यंत 2,150 लोकांचा मृत्यू झाला आहे. यापैकी सुमारे 1,200 इस्रायली आहेत. त्याचबरोबर सुमारे 950 पॅलेस्टिनींनाही आपला जीव गमवावा लागला आहे. दरम्यान, मंगळवारी रात्री अमेरिकेचे पहिले वाहतूक विमान दारूगोळा घेऊन इस्रायलच्या नेवाटीम एअरबेसवर पोहोचले. दुसरीकडे, रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी प्रथमच युद्धासंदर्भात वक्तव्य केले आहे. ते म्हणाले- हे युद्ध अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणाचे अपयश आहे. अमेरिका पॅलेस्टिनींच्या हिताकडे दुर्लक्ष करत आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडेन आणि उपराष्ट्रपती कमला हॅरिस यांनी इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांच्याकडून युद्धाच्या परिस्थितीची माहिती घेतली.

# कॉंग्रेसच्या बैठकीत कँडी क्रश!

## » काहीही केले तरी सरकार येणार नाही: भाजप

।नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**छत्तीसगडचे मुख्यमंत्री भूपेश बघेल यांचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे ज्यामध्ये ते कँडी क्रश खेळताना दिसत आहेत. कॉंग्रेसची महत्त्वाची बैठक सुरू असताना मुख्यमंत्री मोबाइलवर गेम खेळत असल्याचे सांगण्यात येत आहे. यावर भारतीय जनता पक्षाने मुख्यमंत्री आणि कॉंग्रेस या दोघांवर निशाणा साधला.**

आता मुख्यमंत्र्यांनी सोशल मीडिया साइट X वर पोस्ट करून प्रतिक्रिया दिली आहे. मुख्यमंत्र्यांनी लिहिले की, पहले भाजपा को ऐतराज़ था कि मैं गेड़ी क्यों चढ़ता हूं, भौंरा क्यों चलाता हूं, गिल्ली डंडा क्यों खेलता हूं, प्रदेश में छत्तीसगढ़िया ओलंपिक क्यों हो रहे हैं? त्यांनी लिहिले- काल मीटिंगच्या आधी मला एक फोटो मिळाला ज्यामध्ये मी कँडी क्रश खेळताना दिसत आहे. त्यावर



### कँडी क्रश खेळणे योग्यच

» मुख्यमंत्री भूपेश बघेल यांचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे ज्यामध्ये ते कँडी क्रश खेळताना दिसत आहेत. कॉंग्रेसची महत्त्वाची बैठक सुरू असताना मुख्यमंत्री मोबाइलवर गेम खेळत असल्याचे सांगण्यात येत आहे.कॉंग्रेसच्या उमेदवार निवडीसंदर्भातील बैठकीकडे लक्ष न देता त्यांनी कँडी क्रश खेळणे योग्य मानले. त्यासोबतच भाजपचे प्रदेशाध्यक्ष अरुण साव यांनीही मुख्यमंत्री भूपेश बघेल आणि प्रदेश प्रभारींचा खरपूस समाचार घेतला.

आता भाजपने आक्षेप घेतला आहे. किंबहुना त्यांना माझ्या अस्तित्वावरच आक्षेप आहे. पण कोण राहणार आणि कोण नाही हे छत्तीसगडचे लोक ठरवतील. मुख्यमंत्र्यांनी लिहिले- मीही गाडी चालवणार, विटी दांडूही खेळणार. कँडी क्रशही माझे आवडते आहे. मी लेव्हल चांगल्या प्रकारे पार केल्या आहेत, हे पुढेही चालू राहील. बाकी छत्तीसगडला कोणाला आशीर्वाद द्यायचा हे माहीत आहे. मंगळवारी उमेदवार निवडीबाबत रायपूरमध्ये कॉंग्रेस राज्य निवडणूक समितीची बैठक झाली, त्यानंतर रात्री कॉंग्रेस स्क्रीनिंग कमिटीची बैठक झाली. हा व्हिडिओ स्क्रीनिंग कमिटीची बैठक सुरू होण्यापूर्वीचा आहे. समितीचे सदस्य उपमुख्यमंत्री टी. एस. सिंहदेव बैठकीला थांबले होते. दरम्यान, मुख्यमंत्री भूपेश बघेल यांनी कँडी क्रश खेळण्यास सुरुवात केली. त्याचवेळी कॉंग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी बैठकीच्या खोलीतील बैठकीचे व्हिडिओ आणि फोटो काढण्यास सुरुवात केली. कम्युनिकेशन विभागाचे प्रमुख सुशील आनंद शुक्ला देखील फोटो काढताना दिसत आहेत. मात्र हा व्हिडीओ व्हायरल झाला आणि तो कोणी बनवला हे अद्याप समोर आलेले नाही. मुख्यमंत्री भूपेश बघेल यांच्या गांभीर्यावर प्रश्न उपस्थित करत आहे. भाजपच्या आयटी सेलचे प्रमुख अमित मालवीय यांनी ट्विटरवर हे छायाचित्र शेअर करताना लिहिले की, छत्तीसगडचे मुख्यमंत्री भूपेश बघेल हेही निश्चित आहेत, त्यांना माहीत आहे की त्यांनी कितीही केले तरी सरकार येणार नाही.

# राजस्थानः निवडणुकीची तारीख बदलली!

।नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

राजस्थानमध्ये निवडणुकीची तारीख बदलली आहे. आता 25 नोव्हेंबरला मतदान होणार आहे. यापूर्वी 23 नोव्हेंबरला मतदान होणार होते. पण देवउठणी एकादशी या मुहूर्तामुळे मतदानाची टक्केवारी कमी होण्याची शक्यता वर्तवली जात होती. निवडणूक आयोगाने केवळ मतदानाच्या तारखेत बदल केला आहे, याशिवाय नामनिर्देशन सुरू करणे आणि नामांकन मागे घेणे, मतमोजणी यासह सर्व वेळापत्रक पूर्वीप्रमाणेच ठेवण्यात आले आहे. आज सकाळीच पालीचे खासदार पीपी चौधरी यांनी निवडणूक आयोगाला पत्र लिहून मतदानाच्या तारखा बदलण्याची मागणी केली होती.

या निवडणुकीच्या प्रचारासाठी राजस्थानमधील राजकीय पक्षांना आता 47 दिवसांचा अवधी मिळणार आहे. 2018 मध्ये 6 ऑक्टोबर रोजी आचारसंहिता लागू झाली आणि 7 डिसेंबर रोजी मतदान झाले. त्यानुसार 2018 मध्ये उमेदवारांना प्रचारासाठी 62 दिवसांचा अवधी मिळाला होता, मात्र 9 ऑक्टोबर रोजी आचारसंहिता लागू झाल्याने आणि 23 नोव्हेंबर रोजी मतदान झाल्याने त्यांना केवळ 45 दिवसांचा अवधी मिळाला होता.

राजस्थानमध्ये, मतदानाच्या दिवशी, संस्कृती आणि धार्मिक श्रद्धेशी संबंधित एक मोठा सण म्हणजे देवउठणी एकादशी. हा सण देशभर साजरा केला जातो. राजस्थानमध्ये त्याचा मोठा प्रभाव आहे. राजस्थानमध्ये या दिवशी मोठ्या प्रमाणात विवाह होतात. मीडिया रिपोर्ट्सनुसार, या दिवशी सुमारे 50 हजार विवाह होणार आहेत. लग्नसोहळ्यांमुळे लोक एका शहरातून दुसऱ्या शहरात जातील. त्याच वेळी, मंडप, खानपान, बँड आदींसह इतर श्रेणी थेट विवाहसोहळ्यांमध्ये सामील होतात. अशा परिस्थितीत हे लोक या दिवशी मतदानासाठी जाऊ शकत नाहीत. याबाबत अनेक सामाजिक संस्थांनी पत्रेही दिली होती.

# संजय दत्त अन् सुनील शेट्टी ईडीच्या जाळ्यात

महादेव बेटींग ॲपविषयी वेगवेगळ्या बातम्या समोर येत असतानाच आणखी एका बातमीनं खळबळ उडवून दिली आहे. लायन बूक ॲपवर आता ईडीनं निशाणा साधला आहे. त्यातून आणखी दोन प्रसिद्ध अभिनेत्यांची नावं समोर आली आहेत. यापूर्वी बॉलीवूडमधील रणबीर कपूर, टायगर श्रॉफ, सनी लियोनी, विशाल ददलानी यांची नावं ही महादेव बेटींग ॲपमधून व्हायरल झाली होती. महादेव बेटिंग ॲपबाबत आता ईडीनं चौकशी सुरु केली आहे. त्यात अनेक अभिनेत्यांची नावं समोर आली आहे. त्यामुळे बॉलीवूडमध्ये चर्चा सुरु झाली आहे. प्रसिद्ध अभिनेते आणि अभिनेत्री यामध्ये अडकले तरी कसे असा प्रश्न नेटकऱ्यांनी सोशल मीडियावरुन विचारला आहे. सध्या पोलिसांनी याप्रकरणात सौरभ चंद्राकर आणि रवि उप्पल यांना ताब्यात घेतले आहे. संशयित आरोपी हे भारत आणि पाकिस्तानमध्ये ते ॲप चालवत होते. असे तपासातून समोर आले आहे. त्यात आता द लॉयन बूक ॲपचे नाव घेतले जात आहे. त्या ॲपचे प्रमोशन हितेश खुशलानी आणि साहिल खान करत होते. इंडिया टुडेनं दिलेल्या माहितीनुसार, द लॉयन बूक ॲपच्या सक्सेस पार्टीचे दिमाखदारपणे आयोजन केले होते. त्या पार्टीमध्ये संजय दत्त, सुनील शेट्टी, सोफी चौधरी, स्नेहा उलाल आणि डेजी शाह उपस्थित होते.



## फरमानीच्या वडील अन् भावाला अटक!

'हर हर शंभू' गाण्याची गायिका फरमानी नाज ही पुन्हा चर्चेत आली आहे. काही महिन्यांपूर्वी तिचा चुलत भाऊ खुर्शीदची चाकूनं भोकसून हत्या करण्यात आली होती. आता तिच्या भावाच्या हत्येचे गुढ उकलले आहे. मुझफ्फरनगर पोलिसांनी तिच्या कुटुंबाबाबत एक धक्कादायक खुलासा केला आहे. फरमानीचा भाऊ आणि वडिलांसह अन्य 2 जणांना अटक केली आली आहे. चुलत भावाच्या हत्येचा कट रचल्याचा आरोप त्यांच्यावर आहे. यासोबतच हत्येसाठी वापरण्यात आलेले दोन चाकू आणि एक दुचाकीही पोलिसांनी जप्त केली आहे. 5 ऑगस्ट रोजी रतनपुरी पोलीस स्टेशन हद्दीतील मोहम्मदपूर माफी गावात खुर्शीदवर काही दुचाकीस्वार हल्लेखोरांनी चाकूने हल्ला केला होता. खुर्शीदला रुग्णालयात दाखल करण्यात आल्यानंतर डॉक्टरांनी तो मृत झाल्याचे घोषित केले. आता या घटनेमागे फरमानीचाच भाऊ आणि वडील असल्याचा खुलासा पोलिसांनी केला आहे. या प्रकरणी गायक फरमानी नाजचे वडील आरिफ आणि भाऊ फरमान यांच्यासह अन्य दोन आरोपी फरियाद आणि झाकीर यांना अटक करण्यात आली आहे. अनैतिक संबंधांच्या संशयावरून फरमानी नाजचे वडील आरिफ आणि भाऊ फरमान आणि अन्य दोन साथीदारांच्या मदतीने खुर्शीदची हत्या केली. या घटनेचा खुलासा झाल्यानंतर पोलिसांनी चारही आरोपींना चौकशीनंतर तुरुंगात पाठवले आहे.

## दिशाला सुरक्षारक्षकानं परत पाठवलं!



प्रसिद्ध अभिनेत्री दिशा पटानी ही आता वेगळ्याच कारणामुळे चर्चेत आली आहे. त्याचे कारण तिच्याबाबत विमानतळावर घडलेला तो प्रसंग. सोशल मीडियावर दिशा ही नेहमीच वेगवेगळ्या गोष्टींमुळे चर्चेचा विषय असते. त्यावरुन तिला आलेल्या प्रतिक्रियाही भलत्याच भन्नाट असतात. दिशा ही बॉलीवूडमधील फिटनेस फ्रीक म्हणून ओळखली जाते. तिला इंस्टावर फ़ॉलो करणाऱ्यांची संख्याही मोठी आहे. ती तिच्या ड्रेसिंग सेन्ससाठी ओळखली जाणारी सेलिब्रेटी आहे. दिशाच्या बाबत घडलेला तो प्रसंग अनेकांच्या प्रतिक्रियेचा विषय आहे. तिला विमानतळावर सुरक्षारक्षकानं हटकल्याचे दिसून आले. तो व्हिडिओ व्हायरल झाला आहे. त्याची चर्चाही होत आहे. सुरक्षारक्षकानं दिशाकडे आय़डी कार्डची मागणी केली होती. तिनं तो न दिल्यामुळे तिला सुरभारक्षकानं पुन्हा पाठवून दिलं. कारण तिच्याकडे ओरिजनल कुठलेही डॉक्युमेंट नव्हते. दिशानं सुरक्षारक्षकाला फोनमधून आयडी कार्ड दाखवले होते. मात्र पुढे तिला विमानतळ सुरक्षारक्षकांनी रोखले. आणि तिल ओरिजनल आधार कार्ड दाखविण्याची विनंती केली. त्या व्हिडिओमध्ये दिसून येते की, तिच्याकडे कोणतेही बॅग नाही. ती तिच्या स्टाफकडे बॅगची मागणी करते. आणि कारकडे जाते. तिथून ती तिचे ओरिजनल आधार कार्ड घेऊन येते. त्यानंतर तिला इंट्री दिली जाते. तो व्हिडिओ मोठ्या प्रमाणात सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.

## आशा पारेख यांनी टोचले कंगनाचे कान



बॉलीवूडची क्वीन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कंगनानं पुन्हा एकदा बॉलीवूडमधील मैत्रीविषयी भाष्य केलं आहे. त्यामुळे ती वादाच्या भोवऱ्यात सापडल्याचे दिसून आले आहे. आपण अनेक बॉलीवूडमधील मैत्रीच्या बातम्या बघतो किंवा त्यांचे ते फोटो, व्हिडिओ पाहतो पण त्यामागील अनेक गोष्टी आपल्याला माहीती आहेत का, यावर कंगना बोलली आहे. कंगनाच्या त्या वक्तव्यावर बॉलीवूडमधील ज्येष्ठ अभिनेत्री आशा पारेख यांनी त्यावर सणसणीत उत्तर दिले आहे. त्याचीही चर्चा सुरु झाली आहे. गेल्या चार दशकांहून अधिक काळ आपल्या नृत्यानं आणि अभिनयानं आशाजी यांनी चाहत्यांच्या मनात स्थान मिळवले आहे. त्यांनी दिलेलं उत्तर कंगनाच्या चाहत्यांच्या चर्चेचा विषय आहे. कंगनाच्या त्या वक्तव्यावरुन जेव्हा आशाजी यांना विचारण्यात आले तेव्हा त्यांनी तिच्यावर परखड शब्दांत टीका केल्याचे दिसून आले आहे. बॉलीवूडमध्ये ज्या मैत्रीविषयी बोलले जाते ती खोटी आणि नाटकी असल्याचे कंगना म्हणाली होती, त्यावर तुम्ही काय सांगाल असा प्रश्न आशाजी यांना विचारण्यात आला होता. या प्रश्नावर उत्तर देताना त्या म्हणाल्या की, मी वहिदा आणि हेलन एकमेकांच्या किती जवळ आहोत हे तुम्हाला माहिती आहे का? आमच्यामध्ये किती मोठी मैत्री आहे याविषयी तुम्हाला काय माहिती, ती खूप घट्ट मैत्री आहे. त्यामुळे तिनं जे काही बोललं त्यावर बाकी काही सांगण्याची गरज नाही. तिला फार कळते का, एवढे वाटते तर तिलाच विचारा की, तिनं कुणाशी मैत्री केली आहे .

## 81 व्या वाढदिवशी बिग बींवर शुभेच्छांचा वर्षाव...



अमिताभ बच्चन यांना बॉलिवूडचे शहंशाह म्हटले जाते. गेल्या अनेक दशकापासून ते सर्वांचे मनोरंज करत आहेत. अमिताभ बच्चन त्यांचा 81 वा वाढदिवस साजरा करत आहेत. या खास प्रसंगी बी-टाऊनचे सर्व स्टार्स त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देत आहेत.

या वयातही ते खुप फिट आणि सक्रिय आहेत. ते मोठ्या उत्साहाने काम करतात. त्यामुळे ते अजूनही सुपरस्टार आहेत. त्याचा चाहतावर्ग तगडा आहे. त्याच्या वाढदिवसानिमित्त चाहत्यांनी त्यांच्या घराबाहेर गर्दी केली होती. तर अनेक कलाकरांनी सोशल मीडियावर पोस्ट शेयर करत त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. त्यातच सातारचा बच्चन म्हणुन लोकप्रिय झालेले मराठमोळे अभिनेते किरण माने यांनी देखील बिग बींसाठी एक खास लांबलचक पोस्ट लिहिली आहे. या पोस्टबरोबर टाकलेलं हे मीम खरंतर बिगबॉसमध्ये 'साताराचा बच्चन' हा टॅग मिळाल्याची खिल्ली होती... पन तरीबी 'मराठी मीम मॉक्स'वरचं हे मीम बघून मी लै हसलो होतो. लैच भारी वाटलंवतं. शाळेत असल्यापास्नं ह्या टोमन्याची सवय हाय मला...."किरन्या माने सोत्ताला बच्चन समजतो." लहानपनापास्नं ऐकत आलोय. खरंतर म्हन्नाऱ्यानं ते चिडून म्हन्लेलं असायचं, पन मनातल्या मनात मी लै खुश हुयाचो! लहानपनी 'बच्चन' हे माझं 'जग' होतं... मायनीच्या 'गरवारे टुरींग टॉकीज'च्या तंबूत बच्चनच्या पिच्चरचं रीळ आल्यापास्नं मी तिथं हजर असायचो. आलेली पोस्टर्स उलगडून बघssत रहानं हा आवडता छंद होता... रीळ चेक करताना टाकलेले फिल्मचे तुकडे मी घेऊन यायचो....

# रोहितचा विराटच्या बालेकिल्ल्यात धमाका!

## हिटमॅन'च्या झंझावाताने अफगाणिस्तानचा उडवला धुव्वा

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**विश्वचषक २०२३ च्या दहाव्या सामन्यात भारताने अफगाणिस्तानचा पराभव केला आहे. या विजयासह भारताने वर्ल्डकपमधील बॅक टू बॅक सामने जिंकले आहेत. भारताकडून कर्णधार रोहित शर्माने वादळी खेळी केली. रोहितने केवळ ८४ चेंडूत १३१ धावांची खेळी केली आहे. याशिवाय विराट कोहलीनेही शानदार खेळी केली आहे. भारताने हा सामना ८ विकेट्सने जिंकला . तर अफगाणिस्तानला दोन्ही सामन्यात पराभव पत्करावा लागला आहे. या सामन्यात रोहितने अनेक विक्रम मोडीत काढले.**

भारत विरुद्ध अफगाणिस्तान यांच्यातील हा सामना दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर खेळला गेला. अफगाणिस्तानने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. सुरुवातीला अफगाणिस्तानने योग्य निर्णय घेतल्याचे दिसत होते, कारण भारतासारख्या भक्कम गोलंदाजीसमोर अफगाणिस्तानने ५० षटकांचा खेळ संपल्यानंतर २७२ धावा केल्या आणि भारतासमोर २७३ धावांचे लक्ष्य ठेवले.भारताचा दिग्गज गोलंदाज जसप्रीत बुमराहने आपल्या चेंडूने कहर केला. बुमराहने १० षटकात केवळ ३९ धावा देत ४ विकेट्स घेतल्या आहेत. यानंतर भारताकडून सलामीला आलेला कर्णधार रोहित शर्मा आणि इशान किशन यांनी पहिल्याच षटकापासून अफगाण गोलंदाजांकडून षटकार मारण्यास सुरुवात केली. इशान किशननेही या सामन्यात चमकदार कामगिरी करत ४७ चेंडूत ४७ धावांची खेळी केली. रोहित आणि इशान बाद झाल्यानंतर विराट कोहली फलंदाजीसाठी मैदानात आला. कोहलीने मागील सामन्यातही अर्धशतकी खेळी केली होती. यानंतर आज पुन्हा एकदा त्याने अर्धशतक झळकावले. आजच्या सामन्यात कोहलीने ५६ चेंडूत ५५ धावांची खेळी केली आहे. या खेळीत कोहलीने ६ चौकारही मारले. याशिवाय श्रेयस अय्यरनेही शेवटच्या क्षणी कोहलीला चांगली साथ दिली आणि २३ चेंडूत २५ धावांची खेळी खेळली. अशा प्रकारे भारताने हा सामना सहज जिंकला आहे. जेव्हापासून भारतीय फलंदाज मैदानात उतरले तेव्हापासून भारताचा सामना अफगाणिस्तानच्या बाजूने झुकल्याचे एकदाही वाटले नाही. अशा प्रकारे भारताने एकतर्फी लढत जिंकली आहे. तत्पूर्वी अफगाणिस्तानने प्रथम फलंदाजी करताना आठ गडी गमावून २७२ धावा केल्या होत्या. भारताविरुद्ध अफगाणिस्तानची ही सर्वात मोठी धावसंख्या ठरली. कर्णधार हशमतुल्ला शाहिदीने सर्वाधिक ८० धावांचे योगदान दिले.

तसेच अजमतुल्ला उमरझाईने ६२ धावा केल्या. या दोघांशिवाय अफगाणिस्तानच्या इतर अनेक फलंदाजांनी चांगली सुरुवात केली, पण कोणीही मोठी खेळी करू शकले नाही. २२ धावा करणारा इब्राहिम झद्रान संघाचा तिसरा सर्वाधिक धावा करणारा फलंदाज ठरला. भारताकडून जसप्रीत बुमराहने सर्वाधिक चार विकेट्स घेतल्या. विश्वचषकातील ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या पहिल्या सामन्यात अपयशी ठरलेल्या रोहित शर्माने दिल्लीत तुफानी फलंदाजी केली. अफगाणिस्तानविरुद्ध त्याने स्फोटक शतक झळकावले. सलामीवीर म्हणून त्याने वनडेतील २९ वे शतक झळकावले आणि सनथ जयसूर्याचा विक्रम मोडला. सलामीवीर म्हणून सर्वाधिक शतकं झळकावण्या बाबतीत तो दुसऱ्या स्थानावर आहे. अफगाणिस्तानविरुद्धच्या डावात त्याने एकाही गोलंदाजाला सोडले नाही आणि ६३ चेंडूत शतक झळकावले. सलामीवीर म्हणून सर्वाधिक शतके करण्याचा विक्रम मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरच्या नावावर आहे. सचिन तेंडुलकरने सलामीवीर म्हणून ४५ शतके झळकावली आहेत.

एकदिवसीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक शतके ठोकणारा तो फलंदाज आहे. एकदिवसीय क्रिकेटमध्ये सचिनची ४९ शतके आहेत. यापैकी त्याने सलामीवीर म्हणून ४५ शतकं ठोकली आहेत. रोहितने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये एकूण ३१ शतके झळकावली आहेत. श्रीलंकेचा महान फलंदाज सनथ जयसूर्याने २८ शतके झळकावली आहेत.



### रोहितने मोडला जयसूर्याचा विक्रम

अफगाणिस्तानविरुद्ध रोहित शर्माने ८४ चेंडूत ५ षटकार आणि १६ चौकारांच्या मदतीने १३१ धावा केल्या. या काळात त्याचा स्ट्राइक रेट १५५.९५95 होता. राशिद खानने रोहित शर्माची विकेट घेतली. गुगली बॉल स्वीप करण्याच्या प्रयत्नात रोहित शर्मा बोल्ड झाला. रोहित २६व्या षटकात बाद झाला. त्यानंतर विराट कोहली आणि श्रेयस अय्यर या दोघांनी टीम इंडियाला विजय मिळवून दिला. सचिन तेंडुलकर, रोहित शर्मा आणि सनथ जयसूर्या यांच्याशिवाय दक्षिण आफ्रिकेचा माजी क्रिकेटर हाशिम आमला सलामीवीर म्हणून सर्वाधिक शतके ठोकण्याच्या बाबतीत चौथ्या स्थानावर आहे. त्याने २७ शतके झळकावली आहेत. आमलाने सलामीवीर म्हणून सर्व शतके झळकावली आहेत. वेस्ट इंडिजचा महान फलंदाज ख्रिस गेलने २५ शतके झळकावली आहेत.

# पाकिस्तानच्या सामन्यात प्रिन्स येतोय!

## शुबमन पाकिस्तानविरुद्धचा सामना खेळणार?

नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**विश्वचषक २०२३ मध्ये भारताची विजयी मोहीम सुरूच आहे. आपल्या दुसऱ्या सामन्यात टीम इंडियाने अफगाणिस्तानचा आठ विकेट्सने पराभव केला. दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या या सामन्यात अफगाणिस्तानने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना ५० षटकात ८ गडी गमावून २७२ धावा केल्या. कर्णधार हशमतुल्ला शाहिदीने ८० धावांची तर अजमतुल्ला उमरझाईने ६२ धावांची खेळी खेळली. आता याचदरम्यान शुबमन गिलबाबत एक चांगली बातमी समोर येत आहे. अफगाणिस्तान सामन्यानंतर इशान किशनने सूचक विधान केले आहे.**

इशान किशनने स्टार स्पोर्ट्सशी बोलताना शुबमन गिलच्या तब्येतीबाबत मोठे अपडेट दिले. तो म्हणाला, “सध्या वैद्यकीय पथकाच्या




देखरेखीखाली आहे. प्लेटलेट कमी झाल्यामुळे त्याला नुकतेच रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, आता तो लवकरच पाकिस्तानविरुद्धच्या पुनरागमन करू शकतो. तो खूप फिटनेसकडे लक्ष देणारा असल्याने त्याची तब्येत झपाट्याने सुधारत आहे. मी तुम्हा सर्वांना सांगू इच्छितो की, राहुल द्रविड आमचे कोच आणि रोहितभाई त्याच्या संपर्कात आहेत. शुबमन बरा होत असून पुढच्या सामन्यात खेळणार का नाही यावर संघ व्यवस्थापन विचार करत आहे. गिल अहमदाबादमध्ये भारतीय संघात सामील होणार आहे. अशा परिस्थितीत तो पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यात खेळण्याची शक्यता आहे. पण गिलसमोर मोठे आव्हान असेल ते मॅच फिट होण्याचे. मात्र, पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यात तो खेळण्याची शक्यता कायम आहे. बीसीसीआयच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की, “शुबमन गिलला तंदुरुस्त होण्यासाठी आणि मॅच फिटनेस परत मिळवण्यासाठी पूर्ण वेळ दिला जाईल. यावेळी त्याच्याजागी बदली खेळाडू शोधण्याचा किंवा चर्चा करण्याचा कोणताही विचार नाही कारण व्यवस्थापन त्याला संघातील एक महत्त्वाचा सदस्य मानत आहे. शुबमनच्या तब्येतीत सुधारणा हो असल्याने लवकरच तो पुनरागमन करेल.

# कोहली-नवीनची दिलजमाई; कॉमेंट्रीला गंभीरची उपस्थिती

नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

आयसीसी वर्ल्डकप २०२३चा ९वा सामना भारत आणि अफगाणिस्तान यांच्यात अरुण जेटली स्टेडियमवर संपन्न झाला. टीम इंडियाचा हा सामना माजी कर्णधार विराट कोहलीच्या घरच्या मैदानावर खेळवला गेला.

अशा परिस्थितीत संपूर्ण क्रिकेट स्टेडियम पूर्णपणे खचाखच भरले जाणे अपेक्षित होते आणि तसेच झाले. याशिवाय, अशा काही गोष्टी आहेत ज्यामुळे सामन्याचा थरार शिगेला पोहोचेल मात्र, सामन्यादरम्यान एक आश्चर्यचकित करणारी घटना घडली.

विराटने नवीन-उल-हकची गळाभेट घेतली. त्यामुळे दोघांमध्ये अखेर समेट घडून आला असे म्हणता येईल. विराटने मोठे मन दाखवले आणि चाहत्यांना देखील न चिडवण्याची विनंती केली. या सर्व प्रकाराचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. अफगाणिस्तानविरुद्धच्या सामन्यादरम्यान एक दृश्य पाहायला मिळाले ज्याने चाहत्यांची मने जिंकली. वास्तविक, सामन्यादरम्यान नवीन-उल-हक आणि विराट कोहली एकमेकांना मिठी मारताना दिसले, ज्याचा फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

माहितीसाठी की, कोहलीने जेव्हा नवीनला मिठी मारली तेव्हा त्याच्या चेहऱ्यावर हसू उमटले होते. दुसरीकडे, जेव्हा दिल्ली स्टेडियममध्ये प्रेक्षकांनी हे दृश्य पाहिले तेव्हा रोमांच शिगेला पोहोचला होता. हे खास दृश्य पाहून चाहत्यांनी कोहली-कोहलीचा जल्लोष सुरु केला. दोघांमधील ही दिलजमाई चाहत्यांनाही आवडली आहे. आयपीएल २०२३मध्ये कोहली आणि नवीन यांच्यात खूप भांडण झाले होते.